# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :– "SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..."**

**संदर्भ :– मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे संदर्भ पत्र. क्र. महाडीबीटी–२०२४–२५/शिष्यवृत्ती शाखा/ , दि. २४/०३/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांनी कळविले आहे की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्य शासन पुरस्कृत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत आपल्या स्तरावरून खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजना SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे तसेच सूचना फलकावर कळविणे आवश्यक आहे.

२) SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्तीकरीता अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी आपल्या स्तरावरून विशेष मोहिम राबविण्यात यावी.

३) SEBC प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी सदर दोन्ही योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सबब, मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल मा. शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे या कार्यालयास jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा.

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/८३३ }
दिनांक :२८/०३/२०२५ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

सोबत:– वरीलप्रमाणे.

**प्रत:** मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/ दिनांक : २४.०३.२०२५

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-/शिष्य/२०२४-२५/SEBC/ E- १४३६६८२ दि. १२.३.२०२५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिनस्त महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्य शासन पुरस्कृत SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन्ही योजना SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असल्याबाबत व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे तसेच सूचना फलकावर कळविणे आवश्यक आहे.

२. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर योजनांतर्गत अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्तीकरीता अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी आपल्या स्तरावरुन विशेष मोहिम राबविण्यात यावी.

३. SEBC प्रवर्गातील एकही पात्र विद्यार्थी सदर दोन्ही योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास ईमेलद्वारे jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 25-03-2025 14:30:23

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे